# आमदार प्रशांत ठाकूर यांचे कामोठेमध्ये आणखी एक जनसंपर्क कार्यालय

पनवेल (प्रतिनिधी) कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांचे कामोठेमध्ये आणखी एक जनसंपर्क कार्यालय उभारण्यात आले असून सेक्टर १८ मधील यश गार्डन अपार्टमेंट येथे सरू झालेल्या या कार्यालर्याचे उदघाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. २५) झाले.

या सोहळयास रायगड जिल्हा कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. भक्तीकुमार दवे, माजी बांधकाम सभापती तथा नगरसेवक मनोहर म्हात्रे, जिल्हा कॉंग्रेसचे उपाध्यक्ष सुदाम पाटील, मानव संसाधन विभागाचे जिल्हाध्यक्ष अभिजीत पाटील, कामोठे कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष सुधाकर पाटील, ज्येष्ठ नेते विठूशेठ गोवारी, पनवेल तालुका युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष अमर पाटील, मागासवर्गीय सेलचे बबन गडवे, प्रमोद रायबोले, अरूण गोवारी, तालुका सरचिटणीस दिनेश शिरसाट, कामोठे शहर महिलाध्यक्षा दिक्षा जगताप, तालुका उपाध्यक्षा माया आहिरे, नीता ससाणे, माया जाधव, मानव संसाधन विभागाचे तालुकाध्यक्ष सुखदीप वालिया, युवा नेते हॅप्पी सिंग, महेंद्र भोपी, वीर सिंग, जाकीर खान, रमेश तुपे, सचिन गायकवाड, विकी वालिया यांच्यासह कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

या जनसंपर्क कार्यालयातून येथील नागरीकांना त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी व मार्गदर्शनासाठी सहकार्य मिळणार असून हे कार्यालय फक्त कॉंग्रेसचे जनसंपर्क कार्यालय राहणार नसून ते एक मदतकार्य पुरविणारे सुविधा केंद्र असणार आहे. त्यामुळे येथील जनतेशी अधिकाधिक संपर्क साधण्यासाठी या कार्यालयाचा उपयोग कार्यकर्त्यांनी करावा. जनसंपर्क वाढवून जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा. **- लोकनेते रामशेठ ठाकूर**

कामोठेमधील जनतेच्या मागण्या प्रशासनाकडे मांडण्याकरीता या जनसंपर्क कार्यालयाचा उपयोग केला जाईल. या कार्यालयातून या परिसरातील नागरीकांची सर्वतोपरी सेवा केली जाईल. त्याचबरोबर शासनाने राबविलेल्या योजनांची माहिती येथुन पुरविली जाईल. **- आमदार प्रशांत ठाकूर**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या रूपाने कार्यसम्राट आणि सर्वसामान्यांशी नाळ जोडली असलेला आमदार पनवेलला मिळाला आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे मार्गदर्शन आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या दुरदृष्टीमुळे पनवेल विधानसभा मतदार संघात झपाटयाने आणि मोठया प्रमाणात विकासकामे झाली आहेत. **- सुदाम पाटील**